# प्रकरण दुसरे

# प्रकरण दुसरे

# सहकारी बँकांचा उदय व विकास

२.१ सहकारी चळवळीचे उगमस्थान

२.२ सहकाराची व्याख्या

२.३ सहकाराची महत्त्वाची लक्षणे

२.४ भारतातील सहकारी बँकांची रचना

२.५ भारतातील सहकारी चळवळीचा उदय

२.६ महाराष्ट्रातील सहकारी चळवळ

२.७ महाराष्ट्रातील सहकारी चळवळीतील विभागीय असमतोल

२.८ सारांश

प्रकरण दुसरे

# सहकारी बँकाचा उदय व विकास

## प्रस्तावना :

मानव हा समाजशील प्राणी आहे. मानवाची प्रगती ही सहकारातून झालेली आहे मानवाच्या सहकाराच्या प्रवृत्तीमधून सहकाराचा विकास मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येतो. मानवाच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक, आर्थिक अशा अनेक गरजांची पूर्तता समाजात राहूनच सहकाराच्या माध्यमातून पूर्ण करता येते. प्राचीन मानवी संस्कृतीच्या इतिहासात सहकारी प्रवृत्तीची अनेक उदाहरणे दिसून येतात. पूर्वीच्या अनेक जमाती आणि शिकारी टोळ्या यांच्याकडे पाहिले तर सहकारी तत्त्वे मानवी जीवनामध्ये बरीच रुजलेली दिसून येतात. पूर्वी एकत्रित जीवन जगण्याची अनेक मानवी जमातींची ती प्रक्रिया होती त्यात सहकार आढळतो जीवन जगणे आणि जीवनाचे संरक्षण करणे या दृष्टिकोनातून मानवाने सहकार अंगीकारला होता.

## २.१ सहकारी चळवळीचे उगमस्थान :-

१८ व्या शतकात इंग्लंडमध्ये प्रथम सहकारी चळवळीचा उदय झाला. तो समान गरजेतून कोळशाच्या खाणीत काम करणाऱ्या मजुरांना बाजारासाठी शहराच्या ठिकाणी जावे लागत असे. त्यासाठी त्यांचा वेळ व पैसा खर्च होईल त्यावर रॉबर्ट ओवेन या सामाजिक कार्यकर्त्याने मार्ग शोधला तो असा होता की, प्रत्येकाने एक- एक पैंड घावा आणि एकाच व्यक्तीने सर्वांचा बाजार आणावा त्यामुळे मजूरांचे श्रम, पैसा व वेळ या सर्वांची बचत झाली. त्याने भांडवल जमा करून एक सहकारी दुकान होय. इंग्लंडप्रमाणे जर्मनीमध्ये देखील परीने शयफेझन व शुल्झडेलिज हे शेतकरी व कामगारांचे प्रश्न सहकारी तत्त्वावर सोडविण्याचा प्रयत्न करत होते.

## २.२ सहकाराची व्याख्या :-

सन १८४४ मध्ये इंग्लंडमधील रॉश्डेल खेड्यातील २८ विणकरांनी



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

'रॉश्डेल इक्विटेबल पायोनियर सोसायटी' हे ग्राहक भांडार सुरू केले. जीवनावश्यक वस्तू स्वस्त किंमतीत उपलब्ध करून देणे हा त्यामागचा हेतू होता. रॉश्डेल प्रर्वतकांनी सहकाराची निश्चित अशी तत्त्वे सांगितली होती त्यातील काही तत्त्वे आजही मूलभूत तत्वे म्हणून मान्य केली जातात. औद्योगिक क्रांतीचे समाजाला जे फायदे झाले त्यापैकी सहकारी चळवळीचा उगम हा एक फायदाच मानावा लागेल.

"सहकार" या संकल्पनेची एकच समर्पक व्याख्या देणे कठीण आहे प्रत्येकाने आपल्या काळातील सहकार चळवळ डोळ्यासमोर ठेऊन व्याख्या केली आहे. सहकाराचे स्वरूप देशापरत्वे भिन्न असून देशातंर्गत स्वरूपसुद्धा भिन्न आढळते त्यामुळे तज्ञांच्या व्याख्यांमध्ये एक वाक्यता आढळत नाही सहकारांची एकच, काटेकोर, रेखीव, तांत्रिक व सर्वमान्य व्याख्या करणे कठीण आहे. प्रत्येक विचारवंताचा समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा आहे, यासाठी सहकाराच्या काही महत्त्वाच्या व्याख्या पाहणे आवश्यक आहे. त्या व्याख्या पढीलप्रमाणे-

### २.२.१ प्रा. लॅम्बर्ट पॉल :

"स्वतः उपभोग करून घेणाऱ्या व्यक्ति समुहांनी स्थापन केलेली व नियंत्रित केलेली व्यवहार संस्था म्हणजे सहकारी संस्था होय. या संस्थेचा कारभार लोकशाही पद्धतीने चालविला जातो. तसेच सभासदांच्या आणि एकूण समाजाच्या सेवेचा प्रयत्न करण्यात येतो."

### २.२.२ एच. कॅलव्हर्ट :

"सहकार हा संघटनेचा असा एक प्रकार आहे की, त्यात काही व्यक्ती मानव म्हणून स्वेच्छेने व समतेच्या तत्त्वावर एकत्र येतात आणि स्वतःच्या आर्थिक हितसंबधाचे संवर्धन करतात."

### २.२.३ कौटील्याचे अर्थशास्त्र :

" जो कोणी सहकारी व्यवस्थेबाहेर राहतो तो आपले सेवक कामासाठी

पाठविलेल्या खर्चात त्याचा वाटा राहील परंतु लाभात मात्र त्याचा वाटा राहणार नाही.''

### २.२.३ वैकुंठलाल मेहता :

''समान आर्थिक उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी समान गरज असणाऱ्या व्यक्तींची स्वेच्छेने संघटन स्थापन करण्यास प्रवृत्त करणारी चळवळ म्हणजे सहकार होय.''

### २.२.४ मॅक्लॅगन कमिटी : (१९५०)

''सहकारी सिद्धांतातून असे स्पष्ट होते की, एकाकी व आर्थिक दृष्ट्या व्यक्तींनी संघटना स्थापन करून परस्पर सहाय्य व नैतिक प्रगतीचे धोरण स्वीकारल्यास त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची संपूर्ण प्रगती तर होतेच शिवाय श्रीमंत व सामर्थ्यशाली व्यक्तींना मिळणारे सर्व भौतिक फायदे त्यांना मिळू लागतात.''

### २.२.५ भारतीय सहकारी कायदा, १९१२-

''सहकारी तत्त्वानुसार आपल्या सभासदांचे आर्थिक हितसंवर्धन करणारी संस्था म्हणजे सहकारी संस्था होय.''

वरील व्याख्यांवरून असे स्पष्ट होते की, कोणत्याही व्याख्या परीपूर्ण नाहीत. काही विचारवंतानी सहकाराचे ध्येय, हेतू डोळ्यासमोर ठेवून व्याख्या केल्या. काहींनी व्याख्येत सहकारांच्या मूलभूत तत्त्वाचा समावेश केला तर काहींनी फक्त सहकारी संघटनेच्या वैशिष्ट्याच्या अनुषंगाने व्याख्या केल्या. गरजांची पूर्तता, स्वावलंबन आर्थिक काटकसर परस्पर साहाय्य, त्याग एकात्मता, स्वातंत्र्य, हक्क, नैतिकता, परिवर्तनशीलता इत्यादी घटकांचा समावेश सहकारात होतो.

## २.३ सहकाराची महत्त्वाची लक्षणे :-

### १. सहकार हे व्यक्तीचे संघटन :-

सहकारी संस्था ही प्रामुख्याने व्यक्तीची संघटना असते. या संस्थेत भांडवलापेक्षा व्यक्ती महत्त्वाची असते.समान विचार व उद्दिष्ट्य असणाऱ्या

व्यक्तीचे संघटन होत असते. असंघटितपणा, अकार्यक्षमता इ. घटकांना सहकारात स्थान नसते.

### २. आर्थिक व्यवहार :-

सहकारी संस्थाचा एक आर्थिक व्यवहार असतो. सभासद स्वतःचे भांडवल एकत्रित करून बाजारात अनेक धोके पत्करून आर्थिक व्यवहार करत असतात. बँक, ग्राहकभांडार, सहकारी उत्पादन व विक्री संस्था या सर्व आर्थिक हेतूने कार्यरत असतात.

### ३. लोकशाही संघटन :-

सहकारी संस्था लोकशाही संघटन असतात. सहकारी संस्थाचा कारभार हा लोकशाही पद्धतीने चालतो. सभासद लोकशाही मार्गाने संस्थेच्या नियंत्रणासाठी संचालक मंडळ निवडून देतात. या संचालक मंडळाचा कारभार संस्थेच्या हेतूविरुद्ध आणि सभासदांना अमान्य असेल तर सभासद लोकशाही मार्गाने आणि मतदानाच्या हक्काने संचालक मंडळ बदलतात त्यामुळे सहकारात लोकशाही नांदत असते.

### ४. ऐच्छिक संघटना :-

सहकारात समान निष्ठा असणारे, समान हेतू असणारे लोक स्वेच्छेने एकत्रित येतात. सहकारी संस्थेचा सभासद होण्यासाठी कोणावरही सक्ती केली जात नाही. सभासद होणे किंवा संघटनेतून बाहेर पडणे या दोन्ही गोष्टी व्यक्तीच्या इच्छेवर अवलंबून असतात.

### ५. नफ्यापेक्षा सेवाभाव महत्त्वाचा :-

इतर व्यवसायात नफा मिळविणे हा प्रमुख उद्देश असतो. परंतु सहकारात दुर्बल घटकांची आर्थिक सेवा हा प्रमुख हेतू असतो. नफ्यापेक्षा सेवाभाव हा सहकारी संस्थेचा प्रमुख आधार असतो.

### ६. आर्थिक व सामाजिक चळवळ :-

सहकारी संस्थेत प्रत्येकास समान वागणूक असते. कोणत्याही तत्त्वावर त्या ठिकाणी भेदभाव नसतो यातून समता निर्माण होते त्यामुळेच ही एक सामाजिक चळवळ बनते. सहकारातून अनेक संस्था सभासदांचे आणि पर्यायाने समाजाचे आर्थिक प्रश्न सोडवित असतात. त्यामुळे समाजात शांतता

प्रस्थापित होत असते. म्हणजेच अनेक सामाजिक समस्या सोडवण्यात सहकार मदत करतो.

### ७. भांडवलावर मर्यादित व्याज :

सहकारी तत्त्वात भांडवलाला गौण स्थान दिले जाते. भांडवलावर मर्यादित व्याज देण्याचा प्रमुख उद्दे श म्हणजे सहकारी संस्थेचा 'ना नफा ना तोटा' हे तत्त्व होय.

## २.४ भारतातील सहकारी बँकांची रचना :


आधुनिक काळात पतपुरवठा करणाऱ्या बँकामध्ये व्यापारी बँका आणि सहकारी बँका असे वर्गीकरण करण्यात येते. सहकारी तत्त्वानुसार सहकारी बँकांची स्थापना झालेली असते सहकारी बँका देखील व्यापारी बँकांच्या प्रमाणेच विविध सेवा आपल्या ग्राहकांना उपलब्ध करून देतात.

सहकारी बँका पुढीलप्रमाणे उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी स्थापन करण्यात आल्या.

१. सहकारी बँकेच्या सभासदांना काटकसर व बचतीची सवय लावणे.
२. सहकारी बँकेच्या सभासदांना बँकिंगच्या सेवा उपलब्ध करून देणे.
३. सहकारी बँकेच्या सभासदांना सुलभ अटीनुसार व कमी व्याजाच्या दराने कर्ज देणे.
४. सहकारी बँकेच्या सभासदांनी काढलेली कर्जे योग्य त्या कारणांसाठी वापरली जातात किंवा नाही यावर लक्ष ठेवणे.
५. सहकारी बँकेचे कर्ज व्यवहारातील धोके कमी करणे.

सहकारी क्षेत्रातील बँकामध्ये "शेती सहकारी बँका" आणि "बिगर शेती सहकारी बँका" असे दोन प्रकार पडतात. बिगरशेती सहकारी बँकांमध्ये राज्य सहकारी बँका, मध्यवर्ती सहकारी बँका, राज्य औद्योगिक बँक, जिल्हा औद्योगिक तसेच नागरी सहकारी बँकांचा समावेश होतो. भारतातील सहकारी बँकांची रचना पुढीलप्रमाणे :-

# भारतातील सहकारी बँकांची रचना



## २.५ भारतातील सहकारी चळवळीचा उदय :

पाश्चिमात्य देशात होणाऱ्या सहकाराचे पडसाद हिंदूस्थानात दिसू लागले आणि पाश्चिमात्य देशापेक्षा हिंदुस्थानला सहकाराची अधिक गरज आहे याची भारतीय विचारवंतांना जाणीव झाली. त्याचा परिणाम म्हणून न्या. महादेव गोविंद रानडे व सर विल्यम वेडर बर्न यांनी शेतकऱ्यांना कमी व्याजाने व योग्य अटीवर कर्ज मिळावे या हेतूने पुरंदर तालुका जिल्हा पूणे येथे 'रूरल बँक' काढण्याचा प्रयत्न केला पण तो अयशस्वी ठरला. महाराष्ट्रातील प्रा. विठ्ठल लक्ष्मण कवठेकर यांनी बडोदा येथे 'अन्योन्य सहाय्यक मंडळी' या सहकारी तत्त्वावरील संस्थेची स्थापना केली व पुर्वीच्या मद्रास राज्यात (सध्याचे तमिळनाडू) कांजीवरन् येथे देशातील पहिली नागरी पतपुरवठा संस्थेची १९०४ साली नोंदणी केली. तर ऑक्टो. १९०५ मध्ये मुंबई इलाख्यात धारवाड येथे 'बेटगिरी पतपुरवठा सहकारी सोसायटी' तर डिसेंबर १९०५ मध्ये म्हैसूर राज्यातील बेंगलोर येथे "बेंगलोर सिटी को-ऑप. क्रेडिट सोसायटी" या संस्था स्थापन झाल्या. परंतु त्याची प्रगती फारशी झाली नाही.

लार्ड कर्जन याने दुष्काळी समितीने केलेल्या शिफारशींचा विचार करून सर एडवर्ड लॉ यांच्या नेतृत्वाखाली एक समिती नेमली या समितीने चौकशी अंती सहकारी संस्थाना सरकारकडून उत्तेजन व मदत मिळणे जरूरीचे आहे असा अभिप्राय दिला. आणि या समितीच्या शिफारसीनुसार देशातील सहकारी चळवळीला कायदेशीर स्वरुप देणारा १९०४ चा हिंदुस्थान सरकारचा पतपुरवठा संस्थाचा पहिला सहकारी कायदा मजूंर करण्यात आला. परंतु १९०४च्या सहकारी कायद्यातील त्रुटी भरून काढण्यासाठी १९१२ चा दुसरा सहकारी कायदा ही या क्षेत्रातील महत्त्वाची घटना होय. या कायद्यानुसार संस्थेचे वर्गीकरण ग्रामीण व नागरी असे न ठेवता जबाबदारीनुसार मर्यादीत व अमर्यादीत असे वर्गीकरण करण्याची तरतूद झाली.

शिवाय सहकारी संस्थातील वाद मिटविण्यासाठी लवादाचीही तरतूद झाली. या कायद्याचा परिणाम म्हणून १९१२ नंतर विविध स्वरुपाच्या संस्था स्थापन झाल्या. १९१५ मध्ये सहकारी संस्थाचा आढावा घेण्यासाठी सरकारने मॅकलेगन समिती नेमली. या समितीने ग्रामीण जनतेला बचतीची सवयी

लावण्यासाठी व त्याची सावकारी पाशातून सुटका करण्यासाठी त्याची आर्थिक गरजा भागवणे आवश्यक आहे या समितीने असा अभिप्राय दिला.

"बँकिंगच्या सर्वसाधारण तत्त्वप्रणालीचे महत्त्व उच्च व मध्यमवर्गीयांना शिकवण्याच्या दृष्टीने नागरी पतपुरवठा संस्था उपयुक्त कार्य करु शकतील."

मॅक्लॅगन समितीच्या शिफारशीनुसार सहकारी संस्थाच्या कायद्यात पुन्हा बदल करण्यात आले व १९१९ चा कायदा अमंलात आला. त्यानुसार सहकार हा विषय केंद्र सरकारकडून प्रांतिक सरकारकडे सोपविणे महत्त्वाचे मानले गेले. प्रांतिक स्तरावर कायद्याच्या रुपाने होत गेलेल्या विविध तरतुदींमुळे हा विषय जनसामांन्यांपर्यंत पोहोचला.

सन १९२९-३९ हा काळ जागतिक महामंदी आणि तिच्या परिणामांचा होता. भारतात शेतमालाच्या किंमती घटल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले. कर्जफेड करणे कठीण झाले. थकबाकीचे प्रमाण वाढले त्यामुळे सहकारी चळवळ थंडावली या काळात अनेक संस्थाचे एकत्रिकरण करण्यात आले. अकार्यक्षम संस्थाची नोंदणी रद्द करण्यात आली यामुळे संस्थाची संख्या घटली.

सन १९३८-४६ या काळात दुसऱ्या महायुद्धास सुरुवात झाल्याने सहकारी चळवळीची प्रगती झाली. १९४४ मध्ये प्रा. डी. आर. गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखालील समितीने भारतातील शेतकऱ्यांना लागणाऱ्या कर्जाबाबत व त्याच्या कर्जबाजारीपणाबाबत शिफारशी केल्या. भारतातील सहकारी चळवळीची भूमिका विषद करताना समितीने सांगितले, "शेतीक्षेत्रातील पतपुरवठ्याची समस्या सोडविण्यासाठी सहकारी चळवळीचा प्रसार व प्रचार हा एकमेव कायमचा मार्ग आहे. याबाबतीत आमचे मतैक्य आहे."

स्वातंत्र्यानंतर भारताने लोकशाही नियोजनाचा स्वीकार केल्याने सहकारी चळवळ महत्त्वाची व परिणामकारक भूमिका पार पाडू शकते, असा विश्वास विविध क्षेत्रातील तज्ञांनी व्यक्त केला. को-ऑपरेटिव्ह प्लॅनिंग कमिटीच्या मते भारतातील आर्थिक नियोजन खऱ्या अर्थाने लोकशाहीयुक्त

करण्यासाठी सहकारी चळवळ हे उत्तम माध्यम आहे. कारण सहकारातून नागरिकांना शिक्षण, नियोजनासाठी अनुकूल वातावरण, नियोजनासाठी सहकार्य म्हणूनच पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून सहकाराचा प्रसार करण्यात आला.

सन १९५४ मध्ये श्री. ए. डी. गोरवाला कमिटीने आपल्या अहवालामध्ये सुचविलेल्या समन्वित ग्रामीण पतपुरवठा योजना यामध्ये सर्व स्तरावर सहकाराची भागीदारी, दीर्घकालीन निधी, पीक कर्ज, मोठ्या सहकारी संस्था पतपुरवठा संस्था व खरेदी विक्री संस्था तसेच खरेदी विक्री संस्थातील समन्वय अधिकारी व कर्मचारी यांचे शिक्षण, कार्यक्रम व परिणामकारक व अंकेक्षण, स्वतंत्र निधी या शिफारशीचा समावेश होतो.

सन १९६९ मध्ये सहकारी पतपुरवठ्यात निर्माण होणाऱ्या समस्यांचा विचार करण्यासाठी व त्यात सुधारणा करण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने सेवानिवृत्त डेप्युटी गव्हर्नर श्री. वेंकटपथ्या यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समिती १९६९ मध्ये नेमली.

सन १९९२ च्या जुलै महिन्यात नरसिंहराव सरकारने नविन आर्थिक धोरण जाहिर केले त्याचा परिणाम म्हणून जागतिकी करणाची प्रक्रिया जलद गतीने सुरु झाली जागतीकीकरणामुळे आर्थिक व औद्योगिक क्षेत्रात प्रचंड प्रमाणात स्पर्धा वाढलेली आहे. विदेशी भांडवलदार व देशातील खाजगी भांडवलदाराशी स्पर्धा करून स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व टिकवून प्रगती करणे अशा दुहेरी कसरतीचे काम सहकारी चळवळीला करावे लागणार आहे.

सन २००१ च्या जुलै महिन्यात कपूर समितीची स्थापना करण्यात आली. या समितीने सहकारी संस्थाचे भागभांडवल तसेच राखीव निधी संस्थाची कर्जफेडीमध्ये वाढ घडवून वाढ घडवून आणण्यात त्याच पद्धतीने सर्व राज्यांनी आदर्श सहकारी कायद्याचा स्वीकार करून त्याची अमंलबजावणी करावी. त्याचपद्धतीने सहकारी बँकांचे असणारे व्याजाचे दर, कर्जाचा वसुलीची पद्धत इत्यादी बाबत शिफारशी केल्या. त्याचपद्धतीने व्यापारी बँकांकडील वसुलीसाठी लवाद मंडळ नेमले जाते. तशा प्रकारे सहकारी बँकाच्या वसुलीसाठी सुद्धा लवाद मंडळ नेमणेबाबत समितीने शिफारस केल्या आहेत.

सन २००५ मधील डॉ. वैद्यनाथ ए. यांच्या अध्यक्षेताखाली नेमण्यात आलेली टास्क फोर्स समितीने आपल्या अहवालात केंद्र सरकारला ग्रामीण सहकारी पतसंस्थाच्या पुनर्रचनेबद्दल शिफारशी केल्या आहेत. त्यात त्यांनी अडचणीतील (नेटवर्क उणे असलेल्या) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या जमेचे इरोझन २५% पेक्षा कमी असले पाहिजे. त्याचप्रमाणे कृषी सहकारी पतसंस्थाच्या कर्जाची वसुली ५०% पेक्षा अधिक असली पाहिजे तसेच टास्क फोर्सच्या अहवालानुसार सहकारी पतपुनर्रचनेचे पॅकेज सुमारे १५००० कोटी रु. आहे. त्यात केंद्रशासनाचा सहभाग ५३% तर राज्याचा सहभाग १६% आहे. सहभागाचे प्रमाण बदलते ठेवण्यात अनुमती देण्यात आली आहे. सहकारी बँकेचे लेखा परीक्षण सर्व पातळीवर चार्टर्ड अकौंटंटनी करणे आवश्यक आहे.

## भारतातील सहकारी चळवळीची प्रगती

**तक्ता क्रमांक २.१**

| वर्ष | संस्थांची संख्या (लाखात) | सभासद संख्या (लाखात) | खेळते भांडवल (कोटी रू.) |
|---|---|---|---|
| १९९७-९८ | ५.०४<br>(२३.६९) | २०९.१२७<br>(२३.६८) | २२७११.१८<br>(२१) |
| २०००-२००१ | ५.२९<br>(२४.८७) | २२८.७६८<br>(२५.९१) | २८५६४.३३<br>(२६.२२%) |
| २००२-२००३ | ५.४५<br>(२५.६२) | २१५.३८१<br>(२४.४१) | १९३७४.५७<br>(१८%) |
| २००४-२००५ | ५.४९<br>(२५.८१) | २२९.५१० <br>(२६) | ३८२७४.९६<br>(३५.१३) |
| एकूण | २१.२७ (१००) | ८८२.७८६ (१००) | १०८९२५.०४ (१००) |

स्रोत : भारतीय रिझर्व्ह बँक : पुरवणी डिसेंबर २००४
'Profile of Co-Operative Movement in India-2004'

वरील तक्ता क्रं. २.१ मध्ये भारतातील सहकारी चळवळीच्या प्रगतीचा आढावा थोडक्यात घेतलेला आहे. सन १९९७-९८ पासून एकूण सहकारी संस्थाची संख्येत झालेल्या बदलाचा विचार करताना १९९७ मध्ये ५.०४

लाख इतक्या संस्था होत्या त्यात २०००-२००१ पर्यंत ४.७२% इतकी वार्षिक वाढ झाली आहे. भारतातील सहकारी चळवळीची प्रगती पाहात असताना संस्थाच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते. सभासदांचा विचार करत असताना १९९७-९८ मध्ये २०९.१२७ लाख इतके सभासद होते त्यात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन सन २००४-२००५ पर्यंत २२९.५१० लाख इतके सभासदामध्ये वाढ झालेली दिसून येते खेळत्या भांडवलामध्ये १९९७-९८ मध्ये असणारे भांडवल सन २००४-०५ या वर्षापर्यंत जवळजवळ ३५.१३% इतकी वाढ झालेली दिसून येते. अशा पद्धतीने भारतातील सहकारी चळवळीची प्रगती झालेली दिसून येते.

## २.६ महाराष्ट्रातील सहकारी चळवळ :

आर्थिकदृष्ट्या अकार्यक्षम व दुबळया असणाऱ्या लोकांना संरक्षण देण्यासाठी सहकाराची भूमिका महत्त्वाची ठरते. शेतकरी, कारागीर, भूमीहीन शेतमजूर, इत्यादींना त्यांचे भांडवलदारांपासून होणारे शोषण थांबवण्यासाठी व त्यांचा आर्थिकदर्जा उंचावण्यासाठी सहकाराने मोलाची मदत केली आहे उदारीकरणानंतरच्या काळात असलेली तीव्र स्पर्धा व दर्जेदार उत्पादने आणि तत्पर सेवा अशा आव्हांनाना सहकारी चळवळीस सामोरे जावे लागत आहे.

सुरुवातीस महाराष्ट्रात सहकारी चळवळ कृषी पतपुरवठ्यापुरतीच मर्यादीत होती नंतरमात्र कृषीमाल प्रक्रिया, पणन कृषी, ग्रामीण उद्योग, ग्राहक भांडारे, सामाजिक सेवा इ. क्षेत्रात विस्तार झाला. यामुळे लोकांच्या राहणीमानात सुधारणा होण्यास मदत झाली. बदलत्या अर्थव्यवस्थेबरोबर बाजाराचा ओघ लक्षात घेता सहकारी चळवळ सपर्धात्मक बनविण्यासाठी तिला योग्य दिशेची आवश्यकता आहे.

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा इतिहास पाहताना देशातील सहकारी चळवळीमध्ये एक अग्रेसर राज्य म्हणून महाराष्ट्र राज्याचा विचार करता येईल. महाराष्ट्रात प्रथमच १९०४ मध्ये निकोलसन रिपोर्टच्या आधारे शेतकी पतपेढ्या कायदा पास करून पेढ्या स्थापन करण्यास सुरुवात केली. अशी पेढी १९०५ मध्ये धारवाड जिल्ह्यात कणगीहल येथे स्थापन केली. ही शेतीक्षेत्रातील पहिली सहकारी संस्था होय. नंतर सस्थांच्या संख्येय वाढ होऊन

गावपातळीवर 'विविध कार्यकारी सोसायटी' येऊन पोहचल्या या संस्थाना मार्गदर्शन करण्यासाठी तालुका पातळीवर सुपरवाझिंग युनियन या नावाच्या संस्था अस्तित्वात आल्या या पतपेढ्याची आर्थिक गरज भागविण्यासाठी मुंबई सेंट्रल को-ऑप. बँक स्थापन झाली. पुढे १९२३ मध्ये तिचे रुपांतर प्रांतिक सहकारी बँकेत झाले. हीच ती सध्याची महाराष्ट्र राज्य सहकारी बँक होय मॅक्लेगन समितीच्या शिफारशीनुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक स्थापन होऊन पतपुरवठ्याची त्रिस्तरीय यंत्रणा अस्तित्वात आली. गावपातळीवर पतपेढ्या सोसायटी. जिल्हा पातळीवर मध्यवर्ती सहकारी बँक आणि राज्य पातळीवर राज्य सहकारी बँक अशी यंत्रणा अस्तित्वात आली.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राज्याने सहकारी चळवळीचा विकास प्रचंड प्रमाणात केला. १९५१ पासून नियोजनाची सुरुवात, अनेक योजना, त्यांची काटेकोरपणे अमंलबजावणी केली. सहकारी चळवळीचा मूळ हेतू शोषणयुक्त समाज निर्माण करणे त्याचबरोबर समाजातील गरजू आणि दुर्बल घटकांना एकत्रित करून सहकाराच्या माध्यमाने आवश्यक सेवा, उत्पादन हाती घेणे ते 'नफा ना तोटा' तत्त्वावर चालवून आर्थिक न्यायायी संकल्पना प्रत्यक्षात आणणे. यावरच सहकारी चळवळीचे यश अवलंबून असते. स्वातंत्र्यानंतर सहकारी चळवळीच्या पाहणीसाठी व तिच्या विकासासाठी अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीच्या शिफारशी व अमंलबजावणीचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागतो. समितीच्याशिफारशीनुसार ग्रामीण विकासासाठी आवश्यक असलेले कार्य या चळवळीमार्फत करण्याचे निश्चित करण्यात आले त्यामुळे विविध कार्यकारी सोसायट्या स्वातंत्र्यानंतर मोठ्या आकाराच्या सेवा सहकारी सोसायट्या झाल्या. त्यांनी फक्त शेतकऱ्यांना कर्जपुरवठा न करता, जीवनावश्यक वस्तू, शेतमाल साठवणुकीच्या सोई, साधनसामग्रीची उपलब्धता करून देणे इ. कार्य पार पाडली त्यामुळे शेतीक्षेत्रातील बराच वर्ग या संस्थांचा सभासद झाला. त्यातूनच १९५०मध्ये पीक कर्जयोजना राज्य सहकारी बँकेच्या माध्यमातून पुढे आली. १९५०मधील गाडगीळ समिती व सरैय्या समितीने या योजनेचे महत्त्व स्पष्ट केले होते. त्यांनी ही योजना प्रत्येक शेतकऱ्यासाठी, पिकाच्या लागवडीसाठी आवश्यक आहे आणि या माध्यमातून

पतपुरवठा करताना जमिनीचा आकार विचारात न घेता शेतीतील लागवड आणि उत्पादन विचारात घेऊन कर्जपुरवठा करण्यात यावा अशी शिफारस केली.

स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रात पतपुरवठा संस्थाबरोबर शेतीवर मालाची प्रक्रिया करण्याच्या उद्योगांना सहकारी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली. याचे श्रेय प्रामुख्याने कै. वैकुंठभाई मेहता, कै. डॉ. धनंजयराव गाडगीळ, कै. विठ्ठलराव विखे पाटील यांना द्यावे लागते. यांच्या नेतृत्वामुळेच १९५१ साली प्रवरानगर सहकारी साखर कारखाना लि. प्रवरानगर हा अस्तित्वात आला. आणि सहकाराचे नवे प्रर्व सुरु झाले. या कारखान्याच्या सुरुवातीनंतर महाराष्ट्रातील अनेक मंडळी सहकाराच्या विकासासाठी पुढे आली. त्यात कै. भाऊसाहेब हिरे, कै. वसंतदादा पाटील, कै. शंकरराव मोहिते पाटील, कै. तात्यासाहेब कोरे, कै. डॉ. रत्नाप्पाण्णा कुंभार, यशवंतराव मोहिते, विक्रमसिंह घाटगे, कल्लाप्पाण्णा आवाडे, राजारामबापू पाटील इत्यादी लोकनेत्यांचा उल्लेख करावा लागतो. साखर कारखानदारी हे महाराष्ट्राचे वैभव आणि ग्रामीण विकासाचा केंद्रबिंदू आहे. या क्षेत्रातील यशाने इतर क्षेत्रातही महाराष्ट्राने पुढाकार घेतला. त्यात सुतगिरण्या, तेलगिरण्या, भातगिरण्या, फळप्रक्रिया, कापूस जिनिंग इ. मध्ये मोठ्या प्रमाणात सहकाराचा विकास घडून आला. त्याचप्रमाणे दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, वराहपालन, मच्छीपालन या क्षेत्रातही संस्था स्थापन झाल्या असून त्याची प्रगती झालेली आहे. हे यश संपूर्ण राज्यात नसले तरी परंपरागत शेतीपद्धतीमधून आधुनिक व्यवसायाकडे शेतकऱ्यांना आकर्षित करण्याचे कार्य सहकाराने केले आहे.

महाराष्ट्रात १९६० नंतर मोठ्या प्रमाणात दुर्बल घटकांचा सहकारी संस्थाचा जन्म झाला. त्यात जंगल कामगार संस्था, बलुतेदार संस्था, विणकर संस्था, कारागिरांच्या संस्था वगैरेचा उल्लेख करावा लागेल. अशा प्रकारच्या संस्था अस्तित्वात येणे, समान घटकांना त्याचा आर्थिक उन्नतीसाठी त्या आवश्यक वाटणे, यातच सहकाराचे महत्व साठविलेले आहे ही जाणीव त्या वर्गात निर्माण करून संस्थांच्या माध्यमातून विकासास मदत करणे हे महत्त्वाचे आहे खालील तक्ता क्र. २.२ वरून महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रगती कशापद्धतीने झाले आहे याची माहिती घेतली आहे.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

तक्ता क्रमांक २.२

# महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रगती

| अ. क्र. | सहकारी संस्थेचा प्रकार | १९९१ | २००१ | २००२ | २००३ | २००४ | २००५ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शिखर व मध्यवर्ती बिगर पतपुरवठा संस्था | ३१ (१३.९०) | (८.८२) ३४ (१५.२४) | ३४ (१५.२४) | ३४ (१५.२४) | (३५.८४) ५३ (२४) | (-४३.२४) ३७ (१७) | २२३ (१००) |
| २. | प्राथमिक कृषि पतसंस्था | १९५६५ (१६) | २०५५१ (१६.६१) | २०६७४ (१७) | २०८३९ (१७) | २१००० (१७) | २१०८९ (१७.४) | १,२३,७१८ (१००) |
| ३. | बिगर कृषि पतसंस्था | ११२९४ (८.४४) | २२०१४ (१६.४५) | २३५५५ (१७.६०) | ९५१०७ (१९) | २५६६४ (१९.१८) | २६१३७ (१९.५३) | १,३३,७७१ (१००) |
| ४. | पणन संस्था | ९३१ (१३.३५) | ११९५ (१६) | ११४० १६.३५) | १२५२ (१८) | १२२० (१७.४९) | १३१४ (१९) | ६९७२ (१००) |
| ५. | समाजसेवी व इतर संस्था (ग्राहक भांडारे, गृहनिर्माण इ.) | ४३८४५ (९.३२) | ७५२३३ (१६) | ८०८६५ (१७.२०) | ८५९९९ (१८.२९) | ९००५३ (१९.१५) | ९४१०६ (२०) | ४,७०,१०१ (१००) |
| ६. | उत्पादक उपक्रम | २८९५४ (१२.५७) | ३९०७० (१७) | ३९५२१ (१७.१६) | ४०१७१ (१७.४४) | ४०८८१ (१८) | ४६६९९ (१८.१०) | २,३०,२९६ (१००) |

संदर्भ : सहकार सप्ताह विशेषांक - ऑक्टोबर-नोव्हें. २००५ (Page No. 33)
- डॉ. व्ही. बी. जुगळे व डॉ. पी. ए. कोळी Reasserting the co-operative movement (Page No. 253)
- Economic Survey of Maharashtra 2002-2003
- महाराष्ट्रातील सहकारी चळवळ : एक दृष्टिक्षेपात - २००२ शासकीय प्रकाशन
- महाराष्ट्रातील सहकारी चळवळ : एक दृष्टिक्षेपात - २००३ शासकीय प्रकाशन
- महाराष्ट्रातील सहकारी चळवळ : एक दृष्टिक्षेपात - २००४ शासकीय प्रकाशन
- महाराष्ट्रातील सहकारी चळवळ : एक दृष्टिक्षेपात - २००५ शासकीय प्रकाशन

वरील तक्ता क्रं. २.२ मध्ये महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रगती कशा पद्धतीने झालेली आहे याची माहिती घेतलेली आहे. यात शिखर व मध्यवर्ती बिगर पतपुरवठा संस्थांची संख्या सन १९९१ मध्ये ३१ होती तर सन २००१ पर्यंत यात झालेली वार्षिक वाढ ही ८.८२% इतकी आहे. तर सन २००४ पर्यंत यात झालेली वार्षिक वाढ ही ३५.८४% इतकी आहे. परंतु सन २००५ या वर्षात ४३.२४% इतकी वार्षिक घट झालेली दिसून येते. म्हणजे यात घट झाली आहे. प्राथमिक कृषी पतसंस्थाची १९९१ ते २००५ या कालावधीत झालेली वाढ ही अल्पशीच असलेली दिसून येते. सन १९९१ मध्ये एकूण संस्थेच्या ८.४४% इतक्या होत्या. सन २००१ पर्यंत १६.४५% ती वाढ झालेली आहे. तर सन २००५ पर्यंत त्यात १९.५३% पर्यंत वाढ झालेली दिसून येते. म्हणजे त्याच्यात वर्षानुवर्षे वाढ होत असलेली दिसते. पणन संस्थांचा वाढीचा विचार करताना १९९१ मध्ये ९३१ असणाऱ्या पणनसंस्था २००२ पर्यंत त्यात २०९ इतक्या नवीन संस्थांची वाढ झालेली आहे. तर सन २००५ पर्यंत त्यात ३८३ एवढ्या नवीन पणन संस्थांची वाढ झालेली दिसून येते. म्हणजे यातसुद्धा वाढ होत असलेली दिसून येते. समाजसेवी व इतर संस्थांची आकडेवारी पाहता सन १९९१ मध्ये ४३८४५ एवढ्या असणाऱ्या संस्थात वाढ होऊन त्या २००५ पर्यंत ९४१०६ पर्यंत त्यात वाढ झाली आहे. उत्पादक उपक्रमाचा विचार करताना १९९१ मध्ये २८९५४ एवढ्या असणाऱ्या संस्थात सन २००१ पर्यंत वार्षिक वाढ ही २५.८९% इतकी झालेली आहे तर सन २००५ पर्यंत यात वार्षिक वाढ ही १२.४५% एवढी झालेली दिसून येते अशा पद्धतीने महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रगती झालेली दिसून येते.

## २.७ महाराष्ट्रातील सहकारी चळवळीतील विभागीय असमतोल :

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा विकास ही राज्याला लाभलेली एक वैभवशाली परंपरा आहे ग्रामीण लोकजीवनाची गरज आणि सामान्य माणसाचा उत्कर्ष डोळ्यासमोर ठेऊन सहकार चळवळीची मुहूर्तमेढ रोवली गेली संबंध देशाच्या तुलनेत महाराष्ट्रातील सहकारी चळवळीने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. आज महाराष्ट्रात सहकारी चळवळ व्यापक पायावर

उभी आहे. पतसंस्था, नागरी बँका, जिल्हा मध्यवर्ती बँक, राज्य सहकारी बँक, पणनसंस्था, उत्पादक संस्था, सुतगिरण्या अशा अनेक क्षेत्रात ही चळवळ आहे. पण दुर्दैवाची बाब अशी की, अजूनही यात प्रादेशिक असमतोल मोठ्या प्रमाणावर आहे. मुंबई आणि पश्चिम महाराष्ट्रात सहकारी चळवळीने फार मोठ्या प्रमाणात यश मिळविले असले तरी विदर्भ, मराठवाडा, कोकण, या भागात सहकारी चळवळीचे अस्तित्व नगण्य आहे. खालील तक्ता क्र. २.३ वरून महाराष्ट्रातील सहकारी चळवळीतील विभागीय असमतोल लक्षात येतो.

# सहकारी चळवळीतील विभागीय असमतोल

## तक्ता क्रमांक २.३

| अ.क्र. | विभागाचे नाव | २००० | २००१ | २००२ | २००३ | २००४ | २००५ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मुंबई विभाग | २०७५४ (१४.२४) | २१४२६ (१३.६०) | २२११७ (१३.१४) | २२८१७ (१३.३२) | २३४३३ (१३.२८) | २४१९१ (१३.२९) |
| २. | कोकण विभाग | २१५२२ (१४.७८) | २१२३६ (१३.४८) | २३६८२ (१४.३६) | २४१७९ (१४.१२) | २५५५४ (१४.४८) | २६७९५ (१४.७२) |
| ३. | नाशिक विभाग | २६००९ (१७.८६) | २६४९९ (१६.८२) | २७८५२ (१६.८९) | २९०२७ (१६.९५) | २९३६७ (१६.६४) | ३०११६ (१६.५४) |
| ४. | पुणे विभाग | २३८७४ (१६.३९) | २४८३८ (१५.७६) | २६७६६ (१६.३२) | २८०७७ (१६.३९) | २८८०६ (१६.३२) | २९००८ (१५.९४) |
| ५. | कोल्हापूर विभाग | १९४३९ (१३.३४) | २१२९६ (१३.५१) | २०३२७ (१२.३२) | २१८३६ (१२.७५) | २२७५६ (१२.८९) | २३६१८ (१२.९७) |
| ६. | औरंगाबाद विभाग | ९९९६ (७.३७) | ९३६६ (५.९४) | १०१७० (६.१६) | १०३६२ (६.०५) | १०५४८ (५.९८) | १०९८५ (६.०३) |
| ७. | लातूर विभाग | १३५७१ (९.३१) | १३९६६ (८.८६) | १४७०८ (८.९२) | १५१३१ (८.८३) | १५४५६ (८.७६) | १५९६५ (८.७७) |
| ८. | अमरावती विभाग | ८५७७ (५.८९) | ८६३४ (५.४८) | ९००४ (५.४६) | ९४१० (५.४९) | ९५५१ (५.४१) | ९८५२ (५.४७) |
| ९. | नागपूर विभाग | ९८७३ (६.७८) | ९९७५ (६.३३) | १०२६१ (६.२२) | १०३९० (६.०६) | १०९६० (६.२१) | ११४४९ (६.२९) |
| १०. | एकूण महाराष्ट्र राज्य | १४५६१५ | १५७२३६ | १६४८८७ | १७१२२९ | १७६४३१ | १८१९७९ |

संदर्भ : सहकार सप्ताह विशेषांक ऑक्टो.-नोव्हें. २००५

वरील तक्ता क्र. २.३ मध्ये महाराष्ट्रातील सहकारी चळवळीतील विभागीय असमतोलाची माहिती दिलेली आहे. सन २००० ते २००५ या कालावधीत महाराष्ट्रात  नऊ विभागात सहकारी संस्थाची प्रगती ही असमतोलरित्या झालेली दिसून येते. सन २००० ते २००५ या कालावधीत पुणे विभागात सहकारी संस्थानी मोठ्या प्रमाणात प्रगती केलेली दिसून येते. एकूण संस्थाच्या १८.४०% संस्था पुणे विभागात असलेल्या दिसून येतात तर त्या खालोखाल नाशिक, कोकण, मुंबई विभागात प्रगती झालेली दिसून येते. सर्वात कमी सहकारी संस्थाची प्रगती ही औरंगाबाद व अमरावती विभागात झालेली आहे. यातील सहकारी संस्थाची वाढ ही ५.२५% एवढी कमी असलेली दिसून येते यावरून असे स्पष्ट होते की महाराष्ट्रातील सहकारी संस्थांची प्रगती ही विभागानुसार कमी जास्त झालेली दिसून येते.

## २.८ सारांश :-

या प्रकरणात सहकारी चळवळीचा उगम कशा पद्धतीने झाला. त्याचबरोबर सहकारांच्या विविध व्याख्या पाहून सहकाराची लक्षणे कोणती आहेत याचा उल्लेख केलेला आहे. सहकाराची रचना कशा पद्धतीची आहे हे पाहून भारतातील सहकारी चळवळ व महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा विकास कशा पद्धतीने झाला याची माहिती घेतलेली आहे.